## प्रकरण- ३ (मॅन्युअल -दोन)

## अधिकारी व कर्मचा-यांचे अधिकार आणि कर्तव्ये

## उप प्रमुख लेखापाल (आस्थापना-दोन) यांची कर्तव्ये आणि जबाबदा-या

उप प्रमुख लेखापाल (आस्था.२) हे लेखा अधिकारी (वेतन निश्चिती कक्ष), लेखा अधिकारी (वेतन सुधारणा), लेखा अधिकारी (एफईएम/एफईई) यांच्यावर नियंत्रण ठेवतील. राज्य शासनाच्या धोरणावर आधारीत महानगरपालिका कर्मचा-यांचे सेवा नियम, मुंबई महानगरपालिका सेवानियमामध्ये सुधारणा/निवृत्ती वेतनामध्ये सुधारणा, महानगरपालिका कर्मचा-यांच्या वेतनश्रेणी/भत्ते यामधील सुधारणा, आस्थापनाविषयक प्रस्ताव, कर्मचा-यांची प्रशिक्षणासाठी प्रतिनियुक्ती इत्यादी संबंधीचे प्रस्ताव उप प्रमुख लेखापाल (आस्था.२) कार्यान्वित करतील.

### लेखा अधिकारी (वेतन निश्चिती कक्ष)
### लेखा अधिकारी (वेतन निश्चिती कक्ष ) यांची कर्तव्ये आणि जबाबदा-या

लेखा अधिकारी, वेतन निश्चिती कक्ष हे वेतन निश्चिती कक्ष उपविभागाचे मुख्य लिपिक/ वरिष्ठ लेखा परीक्षा व लेखा सहाय्यक यांच्या कामावर मुंबई महानगरपालिका सेवा नियम/ निवृत्ती वेतन नियम यातील सुधारणा, महागाई भत्त्यातील वाढ/घट, सेवा नियमातील बदल इत्यादीसंबंधिची परिपत्रके प्रसारित करण्याच्या कामाच्या अनुषंगाने पर्यवेक्षण करणे.

### लेखा अधिकारी (वेतन सुधारणा कक्ष)
### लेखा अधिकारी (वेतन सुधारणा कक्ष) यांच्या जबाबदा-या व कर्तव्ये

महानगरपालिका कर्मचा-यांची वेतनश्रेणी आणि भत्ते सुधारणेसंबंधी महानगरपालिका संघटना व अन्य संघटनांकडून प्राप्त झालेल्या मागण्यांसंबंधीचे विषय हाताळणे व मुख्य लिपिक/ वरिष्ठ लेखा परीक्षा व लेखा सहाय्यक यांच्या कामावर पर्यवेक्षण करणे.

### लेखा अधिकारी (एफईएम/एफईई)
### लेखा अधिकारी (एफईएम/एफईई) यांची कर्तव्ये आणि जबाबदा-या

लेखा अधिकारी (एफईएम/एफईई) हे एफईई/एफईएम उप विभागांच्या मुख्य लिपिक/वरिष्ठ लेखापरीक्षा व लेखा सहाय्यक यांच्या कामकाजावर पर्यवेक्षण करणे आणि निलंबन, सेवेतून काढून टाकणे, करार तत्वावरील सेवा, प्रतिनियुक्ती, बेपत्ता झालेल्या महानगरपालिका कर्मचा-यांचे कुटुंब निवृत्ती वेतनाचे आणि मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदानांचे दावे निकालात काढणे या सारखे आस्थापनाविषयक प्रस्ताव हाताळणे.